# पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६

## प्रभाग क्र. २, फुलेनगर - नागपुर चाळ





परंपरेचा **वारसा**,
**विकासाचा** ध्यास !
**जनसेवेतच** आहे,
सदैव आमचा **श्वास** !

# घड्याळ

**या चिन्हासमोरील**
**बटण दाबून**
**शितल अजय सावंत**
**यांना प्रचंड बहुमतांनी**

## विजयी करा.



| | |
|---|---|
| २. | **नंदिनी सिद्धार्थ घेंडे** |

मतदान :- गुरुवार दि. १५ जानेवारी २०२६ सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत

# मनोगत...

॥ शिक्षणातून प्रगती, विचारातून परिवर्तन ॥

सन्माननीय मतदार बंधू भगिनींनो
सप्रेम जय भीम,

मी सौ. नंदिनी सिद्धार्थ धेंडे,
आज या अहवालाच्या माध्यमातून आपल्याशी संवाद साधताना मला एका समृद्ध सामाजिक वारशाचा सार्थ अभिमान वाटत आहे. पुणे महानगरपालिकेचे माजी उपमहापौर आणि तीन वेळा नगरसेवक राहिलेले डॉ. सिद्धार्थ यशवंत धेंडे यांच्या कार्याचा मला जवळून परिचय आहे. केवळ पत्नी म्हणून नव्हे, तर त्यांच्या प्रत्येक सामाजिक लढ्यात एक सहचारी म्हणून काम करताना मला जनसेवेचे बाळकडू मिळाले.

आमचे कुटुंब हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर चालणारे कुटुंब आहे. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा महामानवाचा संदेश आम्ही केवळ वाचला नाही, तर तो जगण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ. सिद्धार्थ धेंडे यांनी ज्या निष्ठेने वंचितांच्या आणि दलितांच्या हक्कासाठी लढा दिला, तोच वारसा पुढे नेण्याची जबाबदारी आता मी माझ्या खांद्यावर घेत आहे.

माझ्या आजवरच्या सामाजिक कार्यात मी शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक मदत उपलब्ध करून देताना त्यांच्या डोळ्यातील भविष्याचे स्वप्न पाहणे, हेच माझे मुख्य ध्येय राहिले आहे. गरिबीमुळे कोणाचेही शिक्षण थांबू नये, यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत. कारण मला माहित आहे की, एक सुशिक्षित पिढीच समाजाचे आणि देशाचे भवितव्य बदलू शकते.

आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून अधिकृतपणे राजकारणात पाऊल टाकताना मला आपल्या सर्वांच्या आशीर्वादाची गरज आहे. डॉ. सिद्धार्थ धेंडे यांनी लावलेल्या विकासकामांच्या रोपट्याचा आता वटवृक्ष करायचा आहे. दर्जेदार शिक्षण, महिलांचे सन्मानजनक स्थान आणि वंचितांचा विकास या त्रिसूत्रीवर माझा आगामी काळातील भर असेल.

हा कार्य अहवाल म्हणजे केवळ शब्दांची मांडणी नसून, ती माझ्या कामाची वचनबद्धता आहे. आपल्या भागातील प्रत्येक नागरिकाला सन्मानाचे जीवन जगता यावे, यासाठी मी सदैव तत्पर राहीन. आपल्या सर्वांच्या सोबतीने आणि विश्वासाने आपण एक समतावादी आणि प्रगत समाज घडवूया.

धन्यवाद!




आपला नम्र,

**नंदिनी सिद्धार्थ धेंडे**



भारत नगर येथिल ब्लॉक होनारी ड्रेनेज लाईन बदलुन
नविन लाईन टाकायच भुमीपुजन करण्यात आले.




प्रभागामधील ड्रेनेज चे चेंबर साफ़ करण्याकरिता
जेटिंग मशीन चे लोकार्पण करण्यात आले.



टिंगरे नगर ते ई कॉमरझोन रस्त्याच्या दुतर्फा
वृक्षारोपण करण्यात आले.



भारतामधील पहिल्या डिजिटल "AT Ration" (ऑल टाईम रेशन)
मशीनचे लोकार्पण करुन गरजू कुटुंबांना २४x७ स्मार्ट कार्डद्वारे
मोफत धान्य वितरण सुरू करण्यात आले.



विद्यानगर , टिंगरे नगर ते डेक्कन ७५ नंबर बंद पडलेली
बस सेवा नागरिकांच्या सेवे करिता चालु करण्यात आली.



पुण्यनगरीमध्ये प्रथमच
तिबेट शिल्प सारख्या जेतवन बुद्ध विहाराची निर्मिती





राज्य शासनाच्या कौशल्य विकास
व रोज़गार विभाग तथा यश फ़ाउंडेशन यांच्या संयुक्त
विद्यमाने रोज़गार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.



फुलेनगर येथिल रस्त्यावर राहनारे व या शहरांमध्ये कचरावेचक
व साफसफाई चे काम करणारे तसेच कष्टकाम करणाऱ्यांना
एक महिना चे रेशन व जिवनावश्यक वस्तु चे वाटप करण्यात आले.




श्रमिक वसाहत येथील घरांमधे ड्रेनिजचे पाणी येत होते
डॉ धेंडे यानी खात्याचे कर्मचारी यांच्या सोबत पाहणी करून
तात्काळ दुरुस्तीकरण करण्याचे आदेश दिले.



पंचशिल नगर येथिल बीएसयुपी च्या झोपडपट्टी मधिल
घरांच्या कामाची पाहणी करुन व सहा महिना पूर्वी काम
चालु करुन पहिले घर पुर्ण करुन ते कुटुंबाला ताब्यात दिले.



विघानगर टिंगरेनगर रोड नंबर पाँच डांबरीकरणच्या
कामाचे भुमीपुजन करण्यात आले.




सर्व उद्यान व विघ्यानगरल टिंगरेनगर मधिल
प्रमुख चौक व रस्ते या ठिकाणी सुमारे
२० लक्ष रुपयांचे सी.सी.टीव्ही बसविण्यात आले.



पारदर्शकता • जबाबदारी • विकास

१. नंदिनी सिद्धार्थ धेंडे

परंपरेचा **वारसा**,
**विकासाचा** ध्यास !
**जनसेवेतच** आहे,
सदैव आमचा **श्वास** !



# घड्याळ

**या चिन्हासमोरील**
**बटण दाबून**
**शितल अजय सावंत**
**यांना प्रचंड बहुमतांनी**

## विजयी करा.

| | |
|---|---|
| १. | रवी ऊर्फ हर्षल रमेश टिंगरे |

मतदान :- गुरुवार दि. १५ जानेवारी २०२६ सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत

# मनोगत...

सन्माननीय मतदार बंधू भगिनींनो,
सप्रेम नमस्कार,

मी रवी उर्फ हर्षल रमेश टिंगरे
आज या अहवालाच्या माध्यमातून आपल्याशी संवाद साधताना मला अत्यंत अभिमान वाटत आहे. सामाजिक कामाची आवड आणि सामान्य माणसाच्या प्रश्नांची जाण यातूनच माझा इथवरचा प्रवास सुरू झाला. राजकारण हे माझ्यासाठी केवळ सत्ता मिळवण्याचे साधन नसून, ती समाज परिवर्तनाची एक मोठी संधी आहे असे मी मानतो.

गेल्या अनेक वर्षांपासून मला आदरणीय आमदार सुनिल आण्णा टिंगरे यांच्या अतिशय जवळून मार्गदर्शनाचा लाभ मिळाला. राजकारण कसे असावे, लोकांशी नाळ कशी जोडून ठेवावी आणि विकासकामांचा पाठपुरावा कसा करावा, याचे बाळकडू मला त्यांच्याकडूनच मिळाले आहे. आण्णांचा विकासाचा दृष्टिकोन आणि कामाचा वेग हाच माझा आदर्श आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली एक सामान्य कार्यकर्ता म्हणून काम करताना मला जनसेवेची खरी ओढ निर्माण झाली.

आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून मी सक्रिय राजकारणात अधिकृतपणे प्रवेश केला आहे. पक्षाची विचारधारा आणि विकासाचे धोरण घेऊन मला घराघरात पोहोचायचे आहे. शिक्षण, आरोग्य, रस्ते आणि तरुणांच्या हाताला काम या गोष्टींना माझे प्राधान्य असेल. केवळ निवडणुकांपुरते मर्यादित न राहता, ३६५ दिवस जनतेच्या सुखादुखात सहभागी होणारा कार्यकर्ता म्हणून मला ओळखले जावे, हीच माझी प्रामाणिक इच्छा आहे.

प्रशासकीय कामाचा अनुभव आणि लोकांच्या समस्या सोडवण्याची जिद्द घेऊन मी आपल्या सेवेसाठी सज्ज आहे. हा कार्य अहवाल म्हणजे केवळ कामाची यादी नसून, तो माझ्या भविष्यातील संकल्पनांचा आरसा आहे. आपण दिलेल्या प्रेमाच्या आणि विश्वासाच्या जोरावर आपण या मतदारसंघाचा कायापालट करू, असा मला ठाम विश्वास आहे.

तुमच्या आशीर्वादाची आणि पाठबळाची मला नितांत गरज आहे. आपण सर्वांनी मिळून एक आदर्श आणि प्रगत समाज घडवूया.

धन्यवाद!

आपला नम्र,




**रवी ऊर्फ**
**हर्षल रमेश टिंगरे**





ooooooooooooooooooooooooooooooooo
ooooooooooooooooooooooooooooooooo
ooooooooooooooooooooooooooooooooo

ooooooooooooooooooooooooooooooooo
ooooooooooooooooooooooooooooooooo
ooooooooooooooooooooooooooooooooo





ooooooooooooooooooooooooooooooooo
ooooooooooooooooooooooooooooooooo
ooooooooooooooooooooooooooooooooo

ooooooooooooooooooooooooooooooooo
ooooooooooooooooooooooooooooooooo
ooooooooooooooooooooooooooooooooo





ooooooooooooooooooooooooooooooooo
ooooooooooooooooooooooooooooooooo
ooooooooooooooooooooooooooooooooo

ooooooooooooooooooooooooooooooooo
ooooooooooooooooooooooooooooooooo
ooooooooooooooooooooooooooooooooo



पारदर्शकता • जबाबदारी • विकास

१. रवी ऊर्फ हर्षल रमेश टिंगरे




oooooooooooooooooooooooooooooooooo
oooooooooooooooooooooooooooooooooo
oooooooooooooooooooooooooooooooooo




oooooooooooooooooooooooooooooooooo
oooooooooooooooooooooooooooooooooo
oooooooooooooooooooooooooooooooooo




oooooooooooooooooooooooooooooooooo
oooooooooooooooooooooooooooooooooo
oooooooooooooooooooooooooooooooooo




oooooooooooooooooooooooooooooooooo
oooooooooooooooooooooooooooooooooo
oooooooooooooooooooooooooooooooooo



oooooooooooooooooooooooooooooooooo
oooooooooooooooooooooooooooooooooo
oooooooooooooooooooooooooooooooooo



oooooooooooooooooooooooooooooooooo
oooooooooooooooooooooooooooooooooo
oooooooooooooooooooooooooooooooooo



परंपरेचा **वारसा**,
**विकासाचा** ध्यास !
**जनसेवेतच** आहे,
सदैव आमचा **श्वास** !

# घड्याळ

**या चिन्हासमोरील**
**बटण दाबून**
**शितल अजय सावंत**
**यांना प्रचंड बहुमतांनी**

## विजयी करा.



| | |
|---|---|
| ६. | **शितल अजय सावंत** |

मतदान :- गुरुवार दि. १५ जानेवारी २०२६ सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत

# मनोगत...

॥ विश्वासार्हता, विकास आणि विजयाची हॅटट्रिक ॥

नमस्कार,

मी सौ. शितल अजय सावंत

आपल्या सर्वांच्या प्रेमामुळे आणि विश्वासामुळे आजवर जनसेवेची दोन यशस्वी टर्म पूर्ण करताना मला सार्थ अभिमान वाटत आहे. माझे पती अजय भारत सावंत यांची खंबीर साथ आणि सावंत परिवाराचा समाजसेवेचा वारसा हीच माझी खरी ताकद आहे. राजकारणाकडे मी सत्ता म्हणून कधीच पाहिले नाही, तर ते माझ्यासाठी दीनदलितांच्या आणि सर्वसामान्यांच्या सेवेचे व्रत आहे.

गेल्या १० वर्षांत आपण सर्वांनी मिळून आपल्या प्रभागाचा चेहरामोहरा बदलला आहे. महिलांना सक्षम करण्यापासून ते तरुणांना खेळाच्या मैदानात संधी उपलब्ध करून देण्यापर्यंतचा प्रवास आनंदाचा होता. महानगरपालिकेच्या क्रीडा समितीचे अध्यक्षपद भूषवताना खेळाडूंना न्याय देण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न केला. पण माझ्यासाठी खरी पावती ही माझ्या प्रभागात उभी राहिलेली विकासकामे आहेत.

आपल्या भागातील पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी उभारलेली २० लाख लिटर क्षमतेची पाण्याची टाकी असो, किंवा निसर्गरम्य अशा भारत आबा सावंत पाम उद्यानाची निर्मिती असो; आम्ही जे बोललो ते करून दाखवले. विशेषतः राजीव गांधी नगर आणि भारत नगर येथील गरजू नागरिकांसाठी ५५० योजनेअंतर्गत घरे उपलब्ध करून देणे, हे माझ्या आयुष्यातील सर्वात समाधानकारक काम आहे. हक्काचे घर मिळाल्यावर त्या कुटुंबांच्या चेहऱ्यावरील आनंद हाच माझ्या कामाचा खरा मोबदला आहे.

आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची अधिकृत उमेदवारी घेऊन मी पुन्हा एकदा आपल्या समोर येत आहे. पक्षाची विकासाची विचारधारा आणि आदरणीय नेतृत्वाचा विश्वास सोबत आहे. आजवर आपण केलेल्या विकासकामांच्या जोरावर आणि आपल्या अतूट प्रेमाच्या जोरावर मी विजयाची हॅटट्रिक करण्यासाठी सज्ज आहे. हा कार्य अहवाल माझ्या गेल्या १० वर्षांच्या कामाचा हिशोब आणि पुढील ५ वर्षांच्या प्रगतीचा संकल्प आहे.

अधुरे राहिलेले प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आणि आपल्या प्रभागाला पुण्यात मॉडेल बनवण्यासाठी मला पुन्हा एकदा आपले आशीर्वाद हवे आहेत. चला, विकासाची ही घोडदौड कायम राखूया!

धन्यवाद!

आपली नम्र,

६. शितल अजय सावंत

**शितल अजय सावंत**
मा. अध्यक्ष : क्रीडा समिती
मा. नगरसेविका पुणे महानगरपालिका



पुणे शहरातील एकमेव असे
माजी महापौर स्व. भारत आबा सावंत पाम उद्यान



नानासाहेब परुळेकर शाळेजवळ उभी असणारी
२० दशलक्ष लिटरची पाण्याची टाकी




जगद्गुरु महर्षि वाल्मिकी स्वामी चौक येथे
सुशोभिकरण करण्यात आले.



इंदिरानगर, शांतीनगर भागात
बी.एस.यू.पी. अंतर्गत ५५० पक्की घरे बांधून
नागरीकांना सूपूर्त करण्यात आली.




प्रभागामध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज, अंतर्गत जलवाहीनी रस्ते
या कामांची वेळोवेळी पाहणी आणि दुरुस्ती केली.




परिसरातील नगरिकांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी
यासाठी अनेक वाचनालयांची निर्मिती केली.





प्रादेशिक मनोरुग्णालय येरवडा येथे
जेवणाच्या ट्रॉल्या व फळे वाटप.



संकट काळी स्वत: मैदानात उतरुन
नागरिकांना धीर देण्याचे काम व मदत करण्यात आली.



स्वच्छ प्रभाग कचरा मुक्त प्रभाग,
प्रभागामध्ये विविध ठिकाणी कचरा व्यवस्थापनाचे
काम करण्यात आले.



कोविड काळात नागरिकांच्या आरोग्याचा विचार करुन
प्रभागात सर्वत्र कोविड १९ लसीकरण केंद्राची निर्मिती.



कोविड काळात नागरिकांच्या आरोग्याचा विचार करुन
प्रभागात सर्वत्र औषध फवारणी करण्यात आली.



विश्रांत सोसायटी, राजीवगांधी नगर, भारत नगर,
पंचशिल नगर इ. येथे पिण्याच्या पाण्याची
अंतर्गत जलवाहीनी टाकण्यात आली.



पारदर्शकता • जबाबदारी • विकास

६. शितल अजय सावंत

परंपरेचा **वारसा**,
**विकासाचा** ध्यास !
**जनसेवेतच** आहे,
सदैव आमचा **श्वास** !

**घड्याळ**

या चिन्हासमोरील
बटण दाबून
शितल अजय सावंत
यांना प्रचंड बहुमतांनी

**विजयी करा.**



| | |
|---|---|
| ४. | सुहास विजय टिंगरे |

मतदान :- गुरुवार दि. १५ जानेवारी २०२६ सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत

# मनोगत...

सन्माननीय मतदार बंधू भगिनींनो
सप्रेम नमस्कार,

मी सुहास विजय टिंगरे

आज या अहवालाच्या माध्यमातून आपल्याशी संवाद साधताना मनापासून आनंद व कृतज्ञता असा समिश्र भाव व्यक्त करतो. सामाजिक बांधिलकीचे संस्कार मला माझ्या कुटुंबातूनच मिळाले आहेत. माझे थोरले बंधू आणि मार्गदर्शक आमदार सुनिल आण्णा टिंगरे यांच्या सावलीत आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली एक कार्यकर्ता म्हणून माझी जडणघडण झाली. राजकारण हे केवळ अधिकार गाजविण्यासाठी नसून, शासकीय विकासाचा लाभ हा समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहचविण्यासाठी, सामाजिक सलोख्यातून सामाजिक संतुलन राखण्यासाठी तसेच समाजाचा सर्वांगीण व शास्वत उत्कर्ष होण्यासाठी असते, हे मी अण्णांच्या कार्यशैलीतून शिकलो.

व्यावसायाने मी एक बांधकाम व्यावसायिक असलो तरी, माझे मन नेहमीच समाजसेवेत रमले. समाजाचे आपण काहीतरी देणं लागतो, या भावनेतून आम्ही 'विजयमंगल' प्रतिष्ठान ची स्थापना केली. या प्रतिष्ठानच्या माध्यमातून केवळ घोषणा न करता आम्ही प्रत्यक्ष कृतीवर भर दिला आहे. मग ते बेरोजगार तरुणांच्या हाताला काम देण्यासाठी आयोजित केलेले भव्य रोजगार मेळावे असोत, महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी राबवलेले स्त्री सक्षमीकरण उपक्रम असोत किंवा सर्वसामान्यांच्या आरोग्यासाठी घेतलेली मोफत आरोग्य शिबिरे असोत; प्रत्येक कार्यात जनतेचे समाधान हेच माझे यश राहिले आहे.

आता राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या माध्यमातून अधिकृतपणे आणि व्यापक स्वरूपात राजकारणात प्रवेश करताना मला विशेष आनंद होत आहे. बांधकाम क्षेत्रातील माझा अनुभव शहराच्या नियोजित विकासासाठी आणि पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी वापरण्याचा माझा मानस आहे. युवकांचे प्रश्न, महिलांची सुरक्षा आणि ज्येष्ठांचे आरोग्य हे माझे प्राधान्य विषय राहतील.

हा कार्य अहवाल म्हणजे केवळ माझ्या कार्याची पावती नसून, तो भविष्यातील प्रगत मतदारसंघाचा एक रोडमॅप आहे. आमदार सुनिल आण्णा टिंगरे यांचा अनुभव आणि माझी काम करण्याची जिद्द यांच्या संगमातून आपल्याला नवीन उंची गाठायची आहे. विकासाची ही गंगा प्रत्येक घरापर्यंत पोहोचवण्यासाठी मला आपल्या आशीर्वादाची आणि खंबीर साथीची गरज आहे.

आपला विश्वास हीच माझी खरी शक्ती आहे. चला, सोबत मिळून एक नवा इतिहास घडवूया!

धन्यवाद!




आपला नम्र,

**सुहास विजय टिंगरे**



कोराना काळात प्रभागात विविध ठिकाणी
औषध फवारणील, लसीकरण तसेच
जीवनावश्यक वस्तूंचे किट वाटप करण्यात आले.



प्रभागातील गरजु तरुणींसाठी कौशल्य विकास व
व्यवसाय मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले.



प्रभागातील गरजू विद्यार्थ्यांना सायकल वाटप करुन
विद्यार्थ्यांना मार्गदर्शन देखील करण्यात आले.



अतिवृष्टीमुळे आलेल्या पुरामध्ये बाधीत कुटुंबांना
मदतीचा हात म्हणून जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले.



मूळा नदि पूरग्रस्तांना त्या ठिकाणी जाऊन
तातडीची मदत व पूनर्वसन करण्यात आले.



दैनंदिन परिसर स्वच्छ ठेवणाऱ्या
सफाई कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.



पारदर्शकता • जबाबदारी • विकास

४. सुहास विजय टिंगरे



प्रभागात विविध ठिकाणी रक्तदान शिबिर, नेत्रतपासणी शिबिर व मोफत चष्मे वाटप कार्यक्रम घेण्यात आला.



कोरोना काळात नागरिकांची आरोग्य तपासणी करुन मोफत औषधे व भाजीपाला तसेच अन्न धान्य किटचे वाटप करण्यात आले.



महिला सक्षमीकरण कार्यक्रमाअंतर्गत प्रभागातील महिलांसाठी विविध शिबिरांचे आयोजन.



शिवडी जत्रेच्या माध्यमातून विविध बचत गटांचे प्रदर्शन व विक्री कार्यक्रम.



महिलांसाठी गौरी गणपती स्पर्धेचे आयोजन व भव्य बक्षिस समारंभ, लकि ड्रॉ व खेळ




लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणी साठी नाव नोंदणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन.



# पुणे महानगरपालिका
# सार्वत्रिक निवडणूक २०२६

## प्रभाग क्र. 2 मधील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार

(अ) गट



**नंदिनी सिद्धार्थ धेंडे**

(ब) गट



**रवी ऊर्फ हर्षल रमेश टिंगरे**

(क) गट



**शितल अजय सावंत**

(ड) गट



**सुहास विजय टिंगरे**

## घड्याळ या चिन्हासमोरील बटन दाबून सर्व उमेदवारांना प्रचंड बहुमतांनी विजयी करा

| | |
|---|---|
| २. | नंदिनी सिद्धार्थ धेंडे |
| १. | रवी ऊर्फ हर्षल रमेश टिंगरे |
| ६. | शितल अजय सावंत |
| ४. | सुहास विजय टिंगरे |

**राष्ट्रवादी पुन्हा !**

मतदान :- गुरुवार दि. १५ जानेवारी २०२६ सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत